कौ.हिं.म.सं.अ.अर्ज.क्र. ७४/२०२१
सौ. रोशनी वि. प्यारेलाल व ईतर
CNR NO.MHAM12-002397-2021

## निशाणी क्र.०५ वरील आदेश
(दिनांक ०५/०७/२०२३ रोजी पारीत)

०१. अर्जदाराने मुळ अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १२ अन्वये सदर प्रकरण दाखल केले आहे. मुळ अर्जाचा गुणदोषावर निकाल लागण्यास बराच कालावधी लागणार असल्याने अर्जदाराने प्रस्तुतचा अंतरिम अर्ज कलम २३ अन्वये अंतरिम संरक्षण आदेश व अंतरिम खावटी मिळणेकरिता दाखल केला आहे.

**अर्जदाराची थोडक्यात हकीकत खालील प्रमाणे :-**

०२. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह दिनांक ३०/०४/२००८ रोजी पार पडला. त्यांचे विवाह संबंध आजपावेतो कायम आहे. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदारचा पती असुन इतर गैरअर्जदार हे तिचे पतीचे नातेवाईक आहेत. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदारांच्या एकत्र कुटूंबामध्ये नांदावयास गेली. सदर लग्न संबंधातुन उभयतांना तिन मुले आहेत.

०३. लग्नानंतर केवळ तिन महिने गैरअर्जदारांनी अर्जदाराला चांगले वागवीले. त्यानंतर लग्नात चांगला हुंडा मिळाला नाही, या कारणावरून गैरअर्जदार हे अर्जदाराला त्रास देवु लागले. तसेच गैरअर्जदार क्रमांक ०१ हा दारू पिऊन अर्जदाराला शारिरीक व मानसीक

त्रास देत असे. त्याचप्रमाणे ईतर गैरअर्जदार देखिल अर्जदाराचा छळ करत असत. त्याचप्रमाणे गैरअर्जदार हे अर्जदाराकडे पैशाची मागणी करत असत. तिन मुले झाल्यानंतरही गैरअर्जदार क्र. ०१ हा अर्जदाराचे चारित्र्यावर संशय घेत होता व तिसरा मुलगा माझा नाही असे म्हणत असे. तसेच गैरअर्जदार क्रमांक ०१ चे इतर स्त्रीयांसोबत अनैतीक संबंध होते. गैरअर्जदारांच्या शारिरीक, मानसीक व आर्थीक छळाला कंटाळून अर्जदार तिच्या माहेरी दारापूर येथे तिच्या वडिलांचे आश्रयाने राहत आहे. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदाराच्या पालनपोषणाची काहीही सोय केली नाही. त्यामुळे अर्जदाराने गैरअर्जदारांविरुध्द मुळ अर्ज दाखल केला आहे. मुळ अर्जास गुणदोषावर निकाली घेण्यास वेळ लागणार असल्याने अंतरीम खावटी व अंतरिम घरभाडे मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे.

०४. न्यायालयाची नोटीस मिळाल्यानंतर गैरअर्जदार हे न्यायालयात हजर झाले व त्यांनी नि.क्र.११ प्रमाणे त्यांचा लेखी जबाब दाखल केला. जबाबामध्ये गैरअर्जदाराने अर्जदार व गैरअर्जदार यांचेमधील नातेसंबंध मान्य केले. मात्र इतर सर्व आरोप गैरअर्जदारांनी नाकारले आहेत. गैरअर्जदारांचे म्हणण्याप्रमाणे त्यांनी अर्जदाराचा कोणत्याही प्रकारे आर्थीक, मानसीक व शारीरीक छळ केलेला नाही. त्याउलट गैरअर्जदार क्रमांक ०१ हा त्याच्या आई वडिलांचा एकुलता एक मुलगा आहे. मात्र अर्जदाराला गैरअर्जदार क्रमांक ०२ व ०३ यांच्यासोबत राहायचे नव्हते. गैरअर्जदार हे अर्जदारास अतिशय चांगल्या प्रकारे नांदवत होते तरी देखिल कोणतेही कारण नसतांना अर्जदाराने गैरअर्जदारांचा त्याग केलेला आहे. गैरअर्जदार आजही अर्जदारास नांदविण्यास तयार आहेत. त्याचप्रमाणे गैरअर्जदार क्रमांक ०१ याच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नसुन तो मोल मजुरी करतो व त्यास

२००/– ते ३००/– रूपये मजुरी मिळते. तसेच त्याच्यावर तिन मुलांची व त्याच्या आई वडिलांची जबाबदारी आहे. त्यामुळे तो अर्जदाराने मागीतल्याप्रमाणे खावटी देण्यास सक्षम नाही.

०५. उभयतांच्या कथनांचा व कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ च्या तरतूदींचा विचार करता खालील वाद प्रश्न उपस्थित होत असून त्यावरील निश्कर्ष त्यापुढे नोंदविण्यात येत आहे.

| **अनु.क्र.** | **वाद प्रश्न** | **निष्कर्श** |
|---|---|---|
| ०१. | गैरअर्जदारांनी अर्जदाराचा कौटूंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होते काय ? | होकारार्थी |
| ०२. | अर्जदार ही मागीतल्याप्रमाणे अंतरीम संरक्षणात्मक आदेश पात्र आहेत काय ? | होकारार्थी |
| ०३ | अर्जदार ही मागीतल्याप्रमाणे अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? | अंशत: होकारार्थी |
| ०४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

०६. अर्जदारांचे वकिलांनी युक्तीवाद केला की, गैरअर्जदारांनी अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केलेला आहे. गैरअर्जदारांचे हिंसाचारामुळे अर्जदार ही माहेरी राहत आहे. ती स्वत:ची उपजिवीका करण्यास असमर्थ आहे. त्यामुळे पती या नात्याने गैरअर्जदार क्रमांक ०१ याने तिचे पालन पोषन करणे कायदयाने बंधनकारक आहे. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात यावा.

०७. याउलट, गैरअर्जदारांचे वकिलांनी युक्तीवाद केला की, गैरअर्जदारांनी अर्जदाराचा कौटूंबिक हिंसाचार केला नसून ती स्वत:चे मर्जीने माहेरी राहत आहे. त्याचप्रमाणे गैरअर्जदार क्रमांक ०१ याच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तसेच अर्जदार ही स्वत:हुन माहेरी राहत असल्यामुळे सदर अर्ज नामंजूर करण्याबाबत विनंती केली.

०८. उभयतांच्या कथनांची सत्यता पडताळून पाहण्यापूर्वी उभयतांना मान्य असलेल्या बाबींचा विचार करणे गरजेचे आहे. उभयतांना खालील बाबी मान्य असल्याचे त्यांच्या कथनांवरुन आढळून येते.

०१. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह दिनांक ३०/०४/२००८ रोजी संपन्न झाला होता.

०२. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचे विवाहसंबंध आजपावेतो कायम आहेत.

०३. अर्जदार व गैरअर्जदार हे मे २०२१ पासुन विभक्त राहत आहेत.

**<u>वाद प्रश्न क्र.१ करीता :-</u>**

०९. प्रस्तूत अर्ज कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ अन्वये अंतरीम दाद मागण्याकरीता करण्यात आला आहे. सदर कलमान्वये अर्जदाराचा गैरअर्जदाराने कौटूंबिक हिंसाचार केल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट झाल्यास किंवा तसा हिंसाचार ते करण्याची शक्यता असल्यास, सदर अधिनियमाच्या कलम १८ ते २२ प्रमाणे अर्जदारास अंतरीम दाद मागता येते. त्यामुळे सदर अर्जावरील

निर्णयासाठी गैरअर्जदारांनी अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सकृतदर्शनी शाबित होणे आवश्यक आहे.

१०. अर्जदाराचा कौटूंबिक छळ झाला आहे, हे प्रथमदर्शनी दाखविणेकरीता अर्जदाराने तिच्या अर्जात कथन केले आहे की, लग्नानंतर केवळ तिन महिने गैरअर्जदारांनी अर्जदाराला चांगले वागवीले. त्यानंतर लग्नात चांगला हुंडा मिळाला नाही, या कारणावरून गैरअर्जदार हे अर्जदाराला त्रास देवु लागले. गैरअर्जदार क्रमांक ०१ हा दारू पिऊन अर्जदाराला शारिरीक व मानसीक त्रास देत असे. अर्जदार ही प्रतिष्ठीत कुटूंबातील असल्याने ती गैरअर्जदार क्रमांक ०१ चा त्रास सहन करत होती. तिला आशा होती की, काही कालावधीनंतर गैरअर्जदारांचे स्वभावात बदल होतील. मात्र गैरअर्जदार हे छोट्या छोट्या कारणांवरून अर्जदाराला बेदम मारहान करत असत. तसेच तिला मानसीक व शारिरीक त्रास देत असत.

११. अर्जदाराने अर्जात पुढे कथन केले आहे की, सन २००९ मध्ये तिने सर्वज्ञ नावाचे मुलाल जन्म दिला. तसेच सन २०११ मध्ये संस्कृती नावाचे मुलीला जन्म दिला. त्यावेळी ती गरोदर असतांना देखिल गैरअर्जदारांनी तिला शारिरीक व मानसीकरित्या त्रास दिला. त्याचप्रमाणे गैरअर्जदार हे तिच्याकडून शेतामध्ये जनावारासारखे काम करून घेत असत व शेवटी काम व्यवस्थीत केले नाही म्हणुन तीला बोलत असत. जुलै २०१२, मध्ये गैरअर्जदारांनी तिला बेदम मारहान करून माहेरी काढुन दिले होते. त्यावेळी तिने महिला समुपदेशन केंद्र, मुर्तिजापूर येथे तक्रार केली होती. तेथे गैरअर्जदारांनी त्यांची चुक मान्य

करून अर्जदाराला चांगले वागविण्याची हमी दिली. त्यानंतर अर्जदार पुन्हा गैरअर्जदारांकडे नांदण्यास गेली.

१२. अर्जदाराने अर्जात पुढे कथन केले आहे की, पुन्हा नांदण्यास गेल्यानंतर अर्जदार गरोदर राहीली. त्यावेळी गैरअर्जदारांनी तिला दवाखान्यात नेण्यास नकार दिला व अर्जदाराचे पोटात असलेले बाळ माझे नाही, असा आरोप करून तिचे चारित्र्यावर संशय घेतला. गैरअर्जदार क्रमांक ०३ हा देखिल नेहमी अर्जदाराला टोमणे देत असे. अर्जदाराचे माहेरची आर्थीक परिस्थीती चांगली नसतांनाही अर्जदाराचे औषोधोपचाराचा खर्च अर्जदाराचे आई वडिलांना करण्यास भाग पाडले. त्याचप्रमाणे तिसरी मुलगी सानिध्या हिचा जन्म झाल्यानंतर गैरअर्जदारांनी तिला अश्लील भाषेत शिवीगाळ करून मोलकरीन सारखी वागणुक दिली. तसेच अर्जदार ही प्रामाणीकपणे सर्व कामे करीत असतांनाही गैरअर्जदार क्रमांक ०१ हा तिला बोलला की, 'साली, मादरचोद तु आमच्या कामाची नाही, तुझ्यापेक्षा एखादी रखेल ठेवली असती तर पुरल असत'. त्यानंतर गैरअर्जदार क्रमांक ०१ ने अर्जदाराला बेदम मारहान केली. त्यानंतर जुलै २०१५, मध्ये देखिल गैरअर्जदारांनी अर्जदाराला अश्लील बोलुन माहेरी काढुन दिले होते. त्यानंतर एप्रिल २०१९, मध्ये देखिल गैरअर्जदाराला फोन करून आत्महत्या करण्याची धमकी दिली होती. त्यावेळी अर्जदाराने गैरअर्जदारांविरूध्द खोलापूर पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा क्रमांक १३५/२०१९ दाखल केला होता.

१३. अर्जदाराने पुढे कथन केले आहे की, त्यानंतर सप्टेंबर २०१९, मध्ये दोनही

पक्षांची बैठक झाली. त्यावेळी देखिल मुलांच्या भविष्यांचा विचार करून अर्जदार पुन्हा गैरअर्जदारांकडे नांदण्यास गेली. मात्र गैरअर्जदारांचे वर्तणात कोणताही बदल झाला नाही. गैरअर्जदार क्रमांक ०१ हा अर्जदाराला मारहान करून तिच्याकडे घटस्पोटाची मागणी करत असे. तसेच गैरअर्जदार हे अर्जदाराला घराबाहेर जाण्यास व माहेरच्या लोकांना भेटण्यास मनाई करत असत. त्यानंतर गैरअर्जदारांनी पुन्हा एकदा अर्जदाराला माहेरी काढुन दिले होते. त्यानंतर त्यांच्यात पुन्हा एकदा समझोता झाला व अर्जदार गैरअर्जदार हे मोरगांव येथे राहण्यास गेले. मात्र तेथे राहत असतांना अर्जदाराच्या लक्षात आले की, गैरअर्जदार क्रमांक ०१ चे इतर स्त्रीयांसोबत अनैतीक संबंध होते. त्याबाबत विचारणा केली असता गैरअर्जदार क्रमांक ०१ ने अर्जदाराला मारहान केली. त्यामुळे अर्जदार ही नाईलाजास्तव माहेरी राहत आहे.

१४. उलटपक्षी गैरअर्जदार यांनी कथन केले आहे की, त्यांनी अर्जदाराचा कोणत्याही प्रकारे आर्थीक, मानसीक व शारीरीक छळ केलेला नाही. त्याउलट गैरअर्जदार क्रमांक ०१ हा त्याच्या आई वडिलांचा एकुलता एक मुलगा आहे. मात्र अर्जदाराला गैरअर्जदार क्रमांक ०२ व ०३ यांच्यासोबत राहायचे नव्हते. गैरअर्जदार हे अर्जदारास अतिशय चांगल्या प्रकारे नांदवत होते तरी देखिल कोणतेही कारण नसतांना अर्जदाराने गैरअर्जदारांचा त्याग केलेला आहे. गैरअर्जदार आजही अर्जदारास नांदविण्यास तयार आहेत. त्याचप्रमाणे गैरअर्जदार क्रमांक ०१ याच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नसुन तो मोल मजुरी करतो व त्यास २००/– ते ३००/– रूपये मजुरी मिळते. तसेच त्याच्यावर तिन मुलांची व त्याच्या आई वडिलांची जबाबदारी आहे. त्यामुळे अर्जदार ही मागीतल्याप्रमाणे

अंतरीम खावटी मिळण्यास पात्र नाही.

१५. अशाप्रकारे दोन्ही पक्षांचे कथने ऐकल्यानंतर अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये गंभीर स्वरुपाचे कौटूंबिक वाद असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्याचप्रमाणे अर्जदार हिने तिच्या अर्जात ती गैरअर्जदारापासुन वेगळी राहत असल्याची विविध कारणे नमुद केलेले आहे. कोणतीही स्त्री लग्न झाल्यानंतर, १३ वर्षे संसार केल्यानंतर व तिन मुले झाल्यानंतर विनाकारण आपल्या पतीचा त्याग करणार नाही. त्याचप्रमाणे अर्जदाराने तिचे कथनाच्या समर्थनार्थ अभिलेखावर तिने गैरअर्जदाराविरूध्द दिलेल्या अदखलपात्र गुन्हा क्रमांक १३५/२०१९ व १७५/२०२२ च्या तक्रारीच्या प्रती दाखल केल्या आहेत. त्यामुळे प्रथमदर्शणी अर्जदार हिचे कथन विश्वसनिय वाटत आहे.

१६. उलटपक्षी गैरअर्जदारांनी अर्जदाराचा स्वत:हुन त्यांचा त्याग केल्याचे नमुद केले आहे. परंतु, त्याबाबत कुठलाही सकृतदर्शनी पुरावा सादर केलेला नाही. त्याचप्रमाणे विनाकारण अर्जदार हिने गैरअर्जदारांचा त्याग केला आहे, ही गोष्ट कोणत्याही सर्वसामान्य व्यक्तीस पटणारी नाही. त्यामुळे गैरअर्जदारांचे कथन विश्वसनीय वाटत नाही.

१७. त्याचप्रमाणे आपल्या पत्नीचे पालनपोषणाची कोणतीही सोय न करणे हा देखील गंभीर असा कौटूंबिक हिंसाचार आहे. प्रस्तूत प्रकरणात देखील अर्जदार ही मे २०२१, पासुन विभक्त राहत आहे. मात्र दरम्यानचे काळात गैरअर्जदार क्र.१ ने तिचे पालनपोषणाची कोणतीही सोय केल्याचा प्रथमदर्शनी अभिलेखावर आलेले नाही. अशा प्रकारे अर्जदाराचे पालन पोषणाची कोणतीही व्यवस्था न केल्याने गैरअर्जदारांकडून तिचा

कौटूंबीक छळ झाल्याचे दिसुन येते.

१८. वरिल सर्व उहापोह लक्षात घेता सदर अंतरीम अर्ज निकाली काढतांना गैरअर्जदारांनी अर्जदाराचा स्वत:हून त्याग केला व तिचा सांभाळ करण्याची उपेक्षा केल्याचा प्राथमिक निश्कर्ष काढणे न्यायोचित ठरते. त्यामुळे गैरअर्जदारांनी अर्जदाराचा शारिरीक, मानसिक व आर्थीक छळ करुन तिचा कौटूंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होते. सबब वाद प्रश्न क्र.१ चा निश्कर्ष त्याअनुषंगाने होकारार्थी नोंदविण्यात येतो.

**<u>वाद प्रश्न क्र.२ करीता :–</u>**

१९. कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा कलम १८ च्या तरतुदीप्रमाणे पिडीत व्यक्तीस कौटुंबिक हिसांचार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत असल्यास ती सुरक्षा आदेश मिळणेस पात्र ठरते. प्रस्तुत प्रकरणात वाद प्रश्न मुद्दा क्रमांक ०१ चे उत्तर मी होकारार्थी दिले असुन अर्जदार हिस गैरअर्जदारांकडून कौटूंबीक छळ होत असल्याचा निष्कर्श काढला आहे. त्यामुळे मुद्दा क्र.१ प्रमाणे अर्जदार ही सुरक्षा आदेश मिळणेस पात्र ठरते. म्हणुन मी मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>वाद प्रश्न क्र. ३ करीता :–</u>**

२०. पत्नीचे पालनपोषण करणे ही प्रत्येक पतीची कायदेशीर व नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे अर्जदारांनी गैरअर्जदार क्र.१ यांच्याकडून दरमहा ₹ १०,०००/– अंतरीम निर्वाह भत्ता द्यावा अशी मागणी केली आहे.

२१. प्रस्तूत प्रकरणात मी वाद प्रश्न क्र.१ चे उत्तर होकारार्थी दिले असून गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ हिचा कौटूंबिक हिंसाचार करुन विनाकारण त्याग केल्याचा

निश्कर्ष काढला. त्यामुळे निश्चितच अर्जदार ही खावटी मिळण्यास पात्र ठरते. मात्र अर्जदाराला किती अंतरीम निर्वाह भत्ता द्यावा, हे निश्चित करण्यापूर्वी गैरअर्जदार क्र.१ ची आर्थीक ऐपत काय आहे, हे पाहणे आवश्यक आहे.

२२. अर्जदाराने तिच्या अर्जात कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र. १ याचे वडिलांचे नावावर २५ ऐकर शेत जमिन असुन गैरअर्जदार क्रमांक ०१ हा एकुलता एक मुलगा आहे. सदरची सर्व शेती ही गैरअर्जदार क्रमांक ०१ वाहती करत असुन त्यास शेती पासुन दर वर्षी ५०,००,०००/– उत्पन्न मिळते. तसेच त्याच्याकडे ट्रॅक्टर असुन त्यापासुन त्याला दरवर्षे १०,००,०००/– उत्पन्न मिळते. सदर कथनाचे समर्थनार्थ अर्जदाराने गैरअर्जदार क्रमांक ०२ चे नावे असलेल्या गट नंबर ९२ व गट नंबर ४६ मौजा ब्रम्ही, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला येथील शेत जमिनीचे सात बारा उतारे अभिलेखावर दाखल केले आहेत. मात्र सदर शेतीतुन किती उत्पन्न मिळते याबाबत कोणताही ठोस व लेखी पुरावा अर्जदाराने अभिलेखावर आणलेला नाही. उलटपक्षी गैरअर्जदारांनी कथन केले आहे की, गैरअर्जदार क्रमांक ०१ हा मोल मजुरीचे काम करतो व त्याला २००/– ते ३००/– रूपये रोजी मिळते.

२३. वरिल दोनही पक्षांचे कथने पाहिल्यानंतर हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, पत्नी या नात्याने अर्जदाराचा संभाळ करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही गैरअर्जदार क्र. १ ची आहे. गैरअर्जदारांचे कुटूंब हे सधन शेतक–यांचे असुन त्यांच्याकडे मुबलक शेती आहे. मात्र गैरअर्जदार क्रमांक ०१ वर त्याच्या तिन मुलांच्या व आई वडिलांच्या पालन पोषणाची

जबाबदारी आहे. अशा परिस्थितीमध्ये अर्जदारांचे जीवनमान व तिच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदारास दरमहा ₹ ३,०००/– अंतरीम पोटगी स्वरुपात देणे न्यायोचित ठरेल. म्हणुन मी वाद प्रश्न क्र.३ चे उत्तर अंशत: होकारार्थी असे देत आहे.

**वाद प्रश्न क्र.४ करीता :–**

२४. वरील वाद प्रश्न क्र.१ ते ३ यांचा निश्कर्ष विचारात घेता वाद प्रश्न क्र.४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

०१. अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो.

०२. गैरअर्जदारांनी अर्जदारास कोणत्याही प्रकारे शारिरीक व मानसिक त्रास देवु नये, तसेच कौटुंबिक हिंसा करू नये, असा संरक्षणात्मक आदेश देण्यात येतो.

०३. अर्ज दाखल तारखेपासून गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदारास प्रतिमाह ₹ ३,०००/– अर्जाचा निकाल लागेपावेतो अंतरिम निर्वाह भत्ता द्यावा.

०४. सदर आदेशाची प्रत अर्जदाराला विनामुल्य देण्यात यावी.

*स्वा/–*

दिनांक : ०५/०७/२०२३

(अमोल शरद देशमुख)
न्यायादंडाधिकारी प्रथमश्रेणी,
न्यायालय क्र.१, दर्यापूर.